**NAVSHAKTI, SATURDAY,**

**DECEMBER 2, 2017.**

... घोटाळा केल्याप्रकरणी बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या टोळीने अनेक खेळाडूंची फसवणुक केल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे.

विस्तारित केला जाणार आहे.

राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक भगवान यांनी घेतलेल्या निर्णयानुसार, १० डिसेंबरपर्यंत जिल्ह्यातील वेगवेगळ्या वनक्षेत्रात इको शिबिराचे आयोजन करून वस्तूंची पूर्तता करण्यात येणार आहे.

नागपूर विभागातील पेंच आणि बोर व्याघ्र प्रकल्प, उमरेड-कऱ्हांडला अभयारण्य, मोगरकसा, नेत्रवन, कोलितमारा, सालेघाट, चोरबाहुली राखीव वन आणि इतर ... आहे. या सफरीदरम्यान तज्ज्ञ मंडळींकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्यावतीने या कार्यक्रमावर देखरेख केली जाणार आहे.

---

# देश महापालिका निवडणुकांमध्ये
# जय, तर काँग्रेस आणि सपाला दणका

निवडणुकीत खातं देखील उघडता आलं नाही, अशी टीका केली आहे.

**यूपी: पालिका निवडणुकांमध्ये भाजप लाट कायम**

लखनऊ - उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षासह काँग्रेसलाही पराभवाची धूळ चारून सत्तेत आलेल्या भाजपची लाट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही कायम आहे. महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, पंचायत निवडणुकांच्या आतापर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार अनेक ठिकाणी भाजपची विजयी घोडदौड सुरू आहे. महापौरपदाच्या १६ जागांपैकी भाजपने मथुरा, अयोध्येसह १४ जागांवर विजय मिळवला आहे तर २ ठिकाणी बसपाचे महापौर विराजमान होणार आहेत. समाजवादी पक्ष आणि काँग्रेसचा मात्र यावेळीही पार धुव्वा उडाला आहे.

राज्यातील नगरपालिकांच्या १९८ नगराध्यक्षपदांसाठी निवडणूक घेण्यात आली. त्याची मतमोजणी सुरू आहे. बहुतांश जागांवर भाजपने आघाडी घेतली आहे. ७६ जागांवर भाजप, ४० जागांवर बसप, २२ जागांवर समाजवादी पक्ष आणि ५ जागांवर काँग्रेसने आघाडी घेतली आहे. दरम्यान, या निवडणुका म्हणजे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासाठी 'अग्निपरीक्षा'च होती, असे मानले जात होते. निवडणूक निकालांचे चित्र स्पष्ट होताच योगी या परीक्षेत 'उत्तीर्ण' झाले आहेत, असे बोलले जात आहे.

**पुन्हा विकास जिंकला: मोदी**

नवी दिल्ली: - उत्तर प्रदेशमधील जनतेने पालिका निवडणुकांमध्ये पुन्हा एकदा भाजपच्या बाजूने कौल दिला असून या विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मतदारांचे जाहीर आभार मानले आहेत. 'देशात पुन्हा एकदा विकास जिंकला आहे', अशी सूचक प्रतिक्रिया पंतप्रधानांनी या विजयावर नोंदवली.

भाजपच्या विजयाचे श्रेय पंतप्रधानांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना दिले व सर्वांचे अभिनंदन केले. या विजयानंतर आपल्याला आणखी मेहनत घ्यावी लागणार आहे. जनतेच्या कल्याणासाठी जोमाने काम करावे लागणार आहे, असे आवाहनही पंतप्रधानांनी ट्विटरच्या माध्यमातून केले.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी हा विजय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आणि राज्यातील भाजप सरकारच्या लोककल्याणकारी धोरणांचा विजय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

**...तर गुजरात काय जिंकणार?**

मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी पालिका निवडणुकांमधील घवघवीत यशानंतर पत्रकार परिषद घेत काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. गुजरातमध्ये मोठमोठ्या वल्गना करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारा हा निकाल आहे. अमेठी गांधी घराण्याचा गड म्हणून ओळखला जातो पण तिथे काँग्रेसला खातंही उघडता आलं नाही. ज्यांना अमेठी जिंकता येत नाही ते गुजरात जिंकण्याची स्वप्ने कशी काय पाहू शकतात?, असा सवालच आदित्यनाथ यांनी केला. सर्व पालिकांना सशक्त करण्यासाठी आम्हाला जनाधार मिळाला आहे. गेल्या ८ महिन्यांत राज्य सरकारने जे काम केले आहे त्याचीच ही पोचपावती आहे, असेही आदित्यनाथ पुढे म्हणाले. पालिका निवडणुकीतील विजयाने २०१९च्या निवडणुका जिंकण्याचा मार्ग प्रशस्त झाला असून उत्तर प्रदेशात शत-प्रतिशत भाजप हे आमचे लक्ष्य असल्याचा संकल्पच आदित्यनाथ यांनी यावेळी सोडला.

---

# उल्हासनगराचा विकास आराखडा अखेर जनतेसाठी प्रकाशित

**वार्ताहर**

उल्हासनगर, दि. १ - तब्बल ४३ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर उल्हासनगर शहराला विकास आराखडा लाभला आहे. मात्र या विकास आराखडयात बांधकाम व्यावसायिकांच्या इच्छेप्रमाणे आरक्षण टाकण्यात आले असून खुला भूखंड असलेली मैदाने बांधकाम व्यावसायिकांच्या रहिवाशी झोन करीता आंदण दिली असल्याची बाब समोर आली आहे.

उल्हासनगर शहर हे अवघ्या १३ चौरस किलोमीटर परिसरात वसलेले आहे. शहराची लोकसंख्या सुमारे १० लाखापेक्षा अधिक आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे शहर विद्रूप झालेले आहे. शहराचा अमंलात असलेला शहर विकास आराखडा हा १९७४ चा आहे त्यानंतर एम.एम.आर.डी.ए. ने शहर विकास आराखडा बनविला, मात्र तो लागु करण्यात आला नाही. नुकतेच दीड वर्षांपुर्वी शहराचा नवीन प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला होता, मात्र हा विकास आराखडा बिल्डरांचे हित लक्षात घेऊन तयार करण्यात आला असल्याचा आरोप आमदार बालाजी किणीकर यांनी केला होता. हा शहर विकास आराखडा तीन ते चार वर्ष लालफितीत अडकला होता. तब्बल आठ महिन्यानंतर हा शहर विकास आराखडा पालिकेत पोहचला आहे.

हा आराखडा लॅमिनेशन व नक्कल करण्यासाठी अहमदाबाद येथे सेप्ट कंपनी घेऊन गेली होती, शुक्रवारी या विकास आराखड्याच्या प्रति पालिका मुख्यालयाच्या पहिल्या माळ्यावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

---

**TATA**

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम १० (१) अन्वये **याद्वारे सूचना देण्यात येते** की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर निर्गमित करण्यात आलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबध्द नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सवरील व्याजाचे थकीत खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (एनसीडीज्) | रोजीस नियत व्याज | व्याज देयाकरिताची नोंदीत तारीख |
|---|---|---|---|
| १ | दिनांक २२ डिसेंबर, २०१० रोजीस वाटप एनसीडीज १०.२५% एकूण रु. ५०० कोटी. (ISIN:INE081A08140) | २२ डिसेंबर, २०१७ | १८ डिसेंबर, २०१७ |

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
श्रीम. अनिता कल्याणी
अंतरिम कंपनी सचिव

१ डिसेंबर, २०१७
मुंबई

**TATA STEEL**